फक्त पत्रिकाच नव्हे, तर विचारांचा एक मंच जो समाजाला बदलण्याची क्षमता ठेवतो...

Rotary
रोटरी क्लब लातूर

# चक्रधर

अंक दुसरा, सप्टेंबर २०२५

RID : 3132
CLUB NO. : 15520

UNITE FOR GOOD

## शिक्षक...

शिक्षक आरसा असतो विद्यार्थ्यांना दिशा दाखवतो,
ज्ञानाच्या कक्षा रुंदावून अध्यापन करतो
विद्येचा हा सारथी विद्यार्थ्यांचा प्रिय असतो
शिक्षक समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती असतो...

विद्यार्थ्यांना उच्च विद्याविभूषित बनवितो
त्यांना मोठ्या पदावर पाहून आनंदीत होतो
एक सुसंस्कृत समाजाची तो रचना करतो
शिक्षक समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती असतो...


बदलत्या युगात सत्कार्याची वाट दाखवितो
क्षितिजापलीकडे जाण्यासाठी प्रवृत्त करतो
एक परिपूर्ण साक्षर देशाचे स्वप्न पाहतो
शिक्षक समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती असतो...

विद्यार्थ्यांमध्ये प्रेम, स्नेह, सद्भाव जागवतो,
संविधानाच्या मूल्यांवर चालण्याचे शिक्षण देतो
बंधुभाव, सहिष्णुता एकात्मता वृद्धिंगत करतो
शिक्षक समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती असतो...

अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेतो
राष्ट्रहितासाठी सज्जन विद्यार्थ्यांची पिढी घडवितो
तन-मन-धनाने कर्तव्य बजावण्याचा पाठ शिकवितो
शिक्षक समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती असतो...

ज्ञानी, संयम, समर्पण, त्यागी शिक्षक असतो
'बशीर' तो ऐहिक जगात ईश्वराचा प्रतिनिधी असतो
यशस्वी समाज घडविण्याचा तो मार्गदर्शक असतो
शिक्षक समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती असतो...

## देशभरातील शिक्षकांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!





रो. फ्रान्सेस्को ॲरेझ्झो
अध्यक्ष-रोटरी आंतरराष्ट्रीय (२०२५-२६)



रो. सुधीर लातुरे
प्रांतपाल - प्रांत ३१३२



रो. जकी खान कायमखानी
अध्यक्ष : रोटरी क्लब लातूर (२०२५-२६)



रो. विश्वनाथ निगुडगे
सचिव : रोटरी क्लब लातूर (२०२५-२६)

# ज्ञानाचे दीप प्रज्वलित करणाऱ्या गुरूंचा सन्मान

भारतीय संस्कृतीत शिक्षकांना, गुरूंना अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले आहे. गुरू ब्रह्मा, गुरू विष्णु, गुरू देवो महेश्वर या श्लोकातून शिक्षकांचे दैवी स्वरूप स्पष्ट होते. आपल्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर आपल्याला मार्गदर्शन करणारे, ज्ञानाचा प्रकाश देणारे आणि योग्य दिशा दाखवणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे शिक्षक. त्यांच्या सन्मानासाठी दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो. हा दिवस भारताचे माजी राष्ट्रपती, महान तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनी साजरा करण्याची परंपरा आहे.



शिक्षक केवळ पुस्तकातील ज्ञान देत नाहीत, तर जीवन कसे जगावे हे देखील शिकवतात. ते विद्यार्थ्यांच्या चारित्र्य विकासात आणि व्यक्तिमत्त्व घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. शिक्षक म्हणजे फक्त शाळेतील गुरु नव्हे, तर जीवनात जे कोणी आपल्याला काही शिकवतात ते सर्व शिक्षकच असतात.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात माहिती मिळवणे सोपे झाले असले तरी योग्य मूल्यांची जडणघडण करणारा शिक्षकच असतो. संयम, प्रामाणिकपणा, परिश्रम, सामाजिक जबाबदारी यांसारख्या गुणांची प्रेरणा शिक्षकांकडून मिळते. म्हणूनच शिक्षकांचे ऋण फेडणे अशक्य आहे.

शिक्षक दिन

या दिवशी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. विद्यार्थी शिक्षकांचे आभार मानतात, भाषण करतात आणि शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी विशेष समारंभाचे आयोजन केले जाते. शिक्षक हे आपल्या जीवनातील खरे मार्गदर्शक असतात. त्यांचा सन्मान हा फक्त एका दिवसापुरता मर्यादित नसावा. प्रत्येक दिवशी त्यांच्या शिकवणीप्रमाणे वागणे हाच त्यांचा खरा सन्मान आहे. शिक्षकांनी सत्याचा प्रकाश दाखविल्याने आपले जीवन सत्यमय करणे आजच्या काळात खरी गरज आहे.

- डॉ अर्चना विनोद लड्डा

# मराठवाड्यात पावसामुळे अतोनात नुकसान

**५०० हून अधिक पशुधन मृत्युमुखी : पिके गेली वाहून, शेती आणि घरांचेही मोठे नुकसान**



लातूर : ऑगस्टमध्ये झालेल्या पावसामुळे लातूरसह मराठवाड्यातील विविध भागात शेती पिकांसह पशुधनाचे अतोनात नुकसान झाले. त्यामुळे शेतकरी, पशुपालक आर्थिक संकटात सापडले. लातूर जिल्ह्यातील उदगीर, शिरूर अनंतपाळ, देवणी, निलंगा, अहमदपूर, रेणापूर, जळकोट, औसा, लातूर, चाकूर या तालुक्यात मोठे नुकसान झाले. या आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या संपूर्ण कुटुंबांसह पशुधनही मोठ्या प्रमाणावर प्रभावित झाले आहे. अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातील धरणे, लघु, मध्यम प्रकल्प पाण्याने तुडुंब भरले आहेत. त्यामुळे यंदाचा पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचाही प्रश्न मिटणार आहे.

मराठवाड्यात १६४ मोठे आणि २९१ लहान प्राण्यांचा मृत्यू झाला. यातील लातूर जिल्ह्यातील मृत्यूंची संख्या सर्वाधिक होती; नांदेडमध्ये १२६, धाराशिवमध्ये ५३ प्राण्यांचा बळी गेला. अंगणात अचानक झालेल्या वीजस्तंभांसह पुराच्या तांडवात २७ प्राण्यांचा आणखी मृत्यू नोंदवण्यात आला

२०२५ च्या ऑगस्ट महिन्यातील अभूतपूर्व पावसामुळे मराठवाड्यात पिकांचे तसेच पशुंच्या जीवनाला जीवघेणा झटका बसला. आतापर्यंत साधारणपणे ५०० पशु लोकवस्ती आणि ग्रामीण भागात मृत्युमुखी पडले आहेत. पशुमृत्यूमुळे झालेली हानी शेतकऱ्यांवर आर्थिक अस्थिरता आणणारी आहे. अधिकांश कुटुंबाचे जीवन शेती आणि पशुपालनावर अवलंबून असते.

मराठवाड्यातील पशुहानी हे क्षेत्रीय विकासाच्या दृष्टिकोनातून गंभीर समस्या आहे. यावर प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे. पशुधन मालकाला विमा, तत्काळ पशुवैद्यकीय मदत, पुनर्वसन योजना राबविण्यासाठी प्रशासनाने तात्काळ लक्ष देणे गरजेचे आहे.

## रोटरी क्लब लातूरकडून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचा हात...

लातूर जिल्ह्यासह मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीच्या अतोनात नुकसानीमुळे शेतकरी, पशुपालक हतबल झाले आहेत. त्यांच्या मदतीसाठी रोटरी क्लबनेही आपला मदतीचा हात पुढे केला आहे. त्यासाठी खालील मान्यवरांनी आपली मदत रोटरीकडे जमा केली आहे. राज्यभरातील सदस्यांकडून ही मदत जमा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पोहोचविली जाणार आहे.

| रोटरीयन्स | मदत |
|---|---|
| १. रो. जकीखान कायमखानी | ५००० |
| २. रो. बस्वराज उटगे | २००० |
| ३. रो. विश्वनाथ निगुडगे | २००० |
| ४. रो. सुनील कोचेटा | २००० |
| ५. रो. मनोज पाटील | २००० |
| ६. रो. हर्षद राजूरकर | २००० |
| ७. रो. अनिलकुमार थोरमोटे | २००० |
| ८. रो. श्रीराम देशपांडे | २१०० |
| ९. रो. हरिप्रसाद सोमाणी | २००० |
| १०. रो. सतीश दिवाण | २००० |
| ११. डॉ. उमाकांत पाचेगावकर | १५०० |
| १२. रो. सुधाकर कोटगिरे | ११०० |
| १३. रो. राजकुमार गिरवलकर | १००० |
| १४. रो. ब्रह्मकुमार सुवर्णकार | १००० |

सर्व मदत करणाऱ्या रोटरीयन्सचे रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष जकीखान कायमखानी यांनी आभार व्यक्त केले आहेत.

मनोगत

# शिक्षणाचे खरे महत्त्व

समाजाच्या प्रगतीचा पाया शिक्षणात आहे, असे म्हटले जाते. कारण शिक्षण ही केवळ एक प्रक्रिया नसून, ती जीवनाला योग्य दिशा देणारी शक्ती आहे. माणसाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत त्याच्या प्रत्येक टप्प्यावर शिक्षणाची गरज भासते. त्यामुळे शिक्षण हा फक्त एक पर्याय नाही, तर जगण्याची पायाभूत गरज आहे.



**शिक्षणाचा खरा अर्थ**

आजकाल शिक्षण म्हणजे शाळा-कॉलेजमध्ये जाणे, पुस्तके वाचणे, परीक्षा देणे आणि पदवी मिळवणे एवढ्यापुरते मर्यादित मानले जाते. मात्र खरे शिक्षण इतके संकुचित नाही. शिक्षण आपल्याला माणूस बनवते. ते योग्य-अयोग्य, खरे-खोटे यामधील फरक शिकवते. माणसाला केवळ जगण्यासाठीच नव्हे, तर चांगल्या रीतीने जगण्यासाठी जे आवश्यक आहे ते सर्व शिक्षणातून मिळते. समाजात समानता निर्माण होते, कारण शिक्षण लोकांमधील भेदभाव कमी करते. शिक्षण आपल्याला आपले हक्क आणि कर्तव्य समजावून देते. एवढेच नव्हे, तर शिक्षणामुळे माणसामध्ये आत्मविश्वास, सामाजिकता आणि उदारमतवाद विकसित होतो.

**शिक्षणातील दोन पैलू**

शिक्षण हा एका नाण्याचे दोन पैलू आहेत. एका बाजूला आहे ज्ञान, कौशल्य, यश आणि प्रगती; तर दुसऱ्या बाजूला आहे नैतिकता, चारित्र्य आणि मूल्ये. फक्त पैसा कमावण्यासाठी केलेले शिक्षण अपूर्ण आहे. जर शिक्षणात चारित्र्य नसेल, तर ते समाजासाठी धोकादायक ठरते. खरे शिक्षण तेव्हाच पूर्ण होते, जेव्हा पैशासोबत प्रामाणिकपणा, प्रगतीसोबत मूल्ये आणि यशासोबत नैतिकता मिळते.

**खऱ्या शिक्षणाचा मंत्र**

आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की,

फक्त ज्ञान आहे मात्र चारित्र्य नसेल, तर माणूस अहंकारी होतो. म्हणूनच शिक्षणाचा उद्देश माणसाला सर्व बाजूंनी सक्षम करणे हा असतो.

- रो. जकी खान कायमखानी
अध्यक्ष, रोटरी क्लब लातूर

# सावित्रीच्या लेकीचा चांदोली ते थेट इस्त्रो प्रवास

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले या दाम्पत्याने मुलींच्या शिक्षणाची सुरुवात मोठ्या कष्टाने केली. आज त्यांच्याच या शैक्षणिक योगदानामुळे गावखेड्यातील मुली शिक्षण घेऊन सीमापार देशाचा गौरव वाढवित आहे. अशाच एका सावित्रीच्या लेकीने चांदोली ते थेट इस्त्रो प्रवास निश्चित करून सावित्री माईच्या शिक्षणाच्या योगदानाला उजागर केले आहे.



चांदोली अभयारण्य परिसरातील केवळ दीड-दोन हजार लोकसंख्या असलेल्या पांढरेपाणी (ता. पाटण) या दुर्गम गावातील सीमा भागोजी शेळके या विद्यार्थिनीने जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर थेट भारतीय अंतराळ संशोधन संस्थेपर्यंत (इस्त्रो) पोहोचण्याचा मान मिळवला. इस्त्रोला भेट देणाऱ्या १०० विद्यार्थ्यांमध्ये सीमाचा समावेश झाला आहे. राज्यात विजाभज आश्रमशाळा, विद्यानिकेतन शाळा, ऊसतोड कामगारांच्या शाळेतील निवासी विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधनाबद्दल अधिक माहिती मिळावी, या क्षेत्रात स्वारस्य निर्माण व्हावे, तसेच विद्यार्थ्यांना इस्रोची यशोगाथा आणि विज्ञान जागृत करण्याची संधी मिळावी, या उद्देशाने राज्यातील शंभर विद्यार्थ्यांना भारतीय अंतराळ संशोधन संस्थेस भेटीचा उपक्रम राबवला जात आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्यातील उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील निवासी विद्यार्थ्यांची लेखी चाचणी घेऊन यातील शंभर विद्यार्थ्यांची या उपक्रमासाठी निवड केली. यात सीमा शेळकेची वर्णी लागली. सीमाचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गेले. वडील हमाली करून संसाराचा गाडा चालवत होते. सीमा दहावीत असताना त्यांचे निधन झाले. संसाराची जबाबदारी आईवर पडली. आई अशिक्षित, दुर्गम भागात वसलेले गाव. त्यामुळे रोजगार नाही. चार मुलींना जगवायचं कसं? म्हणून तिने थेट मुंबई गाठली. धुणी-भांडी करून संसाराचा गाडा कसा बसा हाकायला लागली. परिस्थितीची जाणीव असल्यामुळे सीमा मनापासून अभ्यास करायची. कोणत्याही क्लासेसशिवाय दहावीच्या परीक्षेत ९० टक्के गुण मिळवून तिने आपली गुणवत्ता सिद्ध केली. रत्नागिरी जिल्ह्यातील निवे बुद्रुक येथे आश्रमशाळेत पहिली ते तिसरी, तर चिकुर्डे येथील आश्रमशाळेत चौथी ते सातवीपर्यंत तिचे शिक्षण झाले. आठवीपासून इस्लामपूरच्या सद्‌गुरू उच्च माध्यमिक आश्रमशाळेत ती शिकते आहे. सध्या बारावीच्या वर्गात ती शिक्षण घेत आहे. विभाग प्रमुख महेश बाबर, सुहासनी शिरोटे, निशिकांत धुमाळे, प्रतिभा पाटील, अजित पवार, तेजस्विनी जाधव, सोनाली जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तिने इस्त्रो भेटीसाठी पात्रता सिध्द केली. संस्थापक सचिव एकनाथराव जाधव, सहसचिव सत्यजित जाधव, संचालक रणजित जाधव, मुख्याध्यापक सचिन पाटील यांनी तिचा सत्कार करून सन्मानित केले. सांगलीच्या इतर मागास बहुजन कल्याणच्या सहाय्यक संचालिका धनश्री भांबुरे म्हणाल्या, इस्रो भेटीसाठी जिल्ह्यातील सहा विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. सद्‌गुरू आश्रमशाळेत शिकणारी सीमा शेळके या विद्यार्थिनीने प्रतिकूल परिस्थितीत मिळवलेले यश उल्लेखनीय असून इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.


सीमा शेळके

- रो. वनिता लचुरिया
अध्यक्ष, रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ लातूर ॲस्पायरेशन.

# रोटरी क्लब लातूरने स्वातंत्र्य दिन केला उत्साहात साजरा

## सेवानिवृत्त सैनिक शब्बीर सय्यद यांचा सत्कार : जकी खान कायमखानी यांच्या हस्ते झाले ध्वजारोहण

लातूर – रोटरी क्लब लातूरच्या वतीने शहरातील औसा रोड येथील कार्यालय परिसरात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष जकीखान कायमखानी यांच्या हस्ते झाले. यावेळी सेवानिवृत्त सैनिक शब्बीर सय्यद यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी भारतीय स्वातंत्र्य सैनिकांच्या शौर्याचा इतिहास सांगत ऑपरेशन सिंदूर व विविध युद्धाबद्दल माहिती सांगितली. शिवाय त्यांनी त्यांच्या कार्यकाळातील चित्तथरारक ऑपरेशनबद्दलचे अनुभवही सांगितले.

यावेळी क्लबचे सचिव रो. विश्वनाथ निगुडगे, रो. मोहन परदेशी, रो. रामप्रसाद राठी, रो. हरीप्रसाद सोमाणी, रो.डॉ. विनोद लड्डा, रो. ॲड. सतीश दिवाण, रो. ॲड बळवंत देशपांडे, रो. सुरेश पेन्सलवार, रो.डॉ. उत्तरेश्वर हेरकर, रो. राजकुमार गिरवलकर, रो. सुनील कोचेटा, रो.ब्रह्मकुमार सुवर्णकार, रो. उमाकांत पेन्सलवार, रो. ॲड जांबुवंतराव सोनकवडे, रो. नानिक जोधवानी, रो. विक्रमसिंह जाधव, रो. बाबुराव सोमवंशी, रो. श्रीमंत कावळे, रो. नरेश कोरे, रो. सत्यनारायण रेड्डी, रो. विलास जिल्हावार, रो. सुशांत कुलकर्णी, रो.दत्ता कावळे, रो. ॲड. विश्वजित कदम, रो. डॉ. उमाकांत पाचेगावकर, रो. सतीश बोरा, रो. आसिफ सय्यद, रो. सुधीर ईटकर, रो. विलास तेरकर, रोटरी सॅटेलाईट अस्पिरेशन क्लबच्या अध्यक्षा सौ. कौशल्या जांबुवंतराव सोनकवडे, सेक्रेटरी सौ. वनिता लचुरिया आणि रो.डॉ. अर्चना लड्डा इ. उपस्थित होते. यावेळी रो. मोहनजी परदेशी यांनी सॅटेलाईट क्लबसाठी देणगी जाहीर केली. त्याबद्दल रोटरी सॅटेलाईट क्लबच्या सचिव वनिता लचुरिया यांनी मनोगत व्यक्त करून आभार मानले. रो. मोहन परदेशी यांचा सत्कार सॅटेलाईट क्लबच्या अध्यक्षा कौशल्या सोनकवडे यांनी केला. यावेळी ऑगस्टमधील वाढदिवस असलेल्या रोटेरियन्सचा यावेळी सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रोजेक्ट चेअरमन रो. नरेश कोरे यांनी सुंदर सजावट, रांगोळी व स्वागताची उत्तम व्यवस्था करून उत्साहाचे वातावरण निर्माण केले. यावेळी सर्व रोटरीयन्स, पत्रकार यांची उपस्थिती होती.
















लोकमत समाचार

एक नजर...

### स्वतंत्रता सेनानी शब्बीर सैयद का सम्मान



लातूर में रोटरी क्लब की ओर से स्वतंत्रता दिवस के उपलक्ष्य में स्वतंत्रता सेनानी शब्बीर सैयद का सम्मान किया गया.

**लातूर.** रोटरी क्लब लातूर की ओर से शहर के औसा रोड पर स्थित कार्यालय परिसर में स्वतंत्रता दिवस मनाया गया. क्लब के अध्यक्ष जकीखान कायमखानी ने ध्वजारोहण किया. समारोह में स्वतंत्रता सेनानी शब्बीर सैयद का सम्मान किया गया. उन्होंने भारतीय स्वतंत्रता सैनिकों के शौर्य का इतिहास बताते हुए ऑपरेशन सिंदूर व विभिन्न युद्धों की जानकारी दी. साथ ही अपने कार्यकाल के विभिन्न ऑपरेशन के अनुभव साझा किए. इस अवसर पर क्लब के सचिव विश्वनाथ निगुडगे, मोहन परदेशी,

दिव्य मराठी लातूर जिल्हा 18-08-2025

### लातूर येथील रोटरी क्लबकडून स्वातंत्र्यसैनिक सय्यद यांचा सत्कार



लातूर । रोटरी क्लब लातूरच्या वतीने शहरातील औसा रोड येथील कार्यालय परिसरात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष रोटेरियन जकीखान कायमखाणी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले आहे. यावेळी माजी स्वातंत्र्य सैनिक शब्बीर सय्यद यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय स्वातंत्र्य सैनिकांच्या शौर्यांचा इतिहास सांगत ऑपरेशन सिंदूर व विविध युद्धाबद्दल माहिती सांगितली. शिवाय त्यांनी त्यांच्या कार्य काळातील चित्तथरारक ऑपरेशनबद्दलचे अनुभवही सांगितले.

स्वातंत्र दिनाचा सोहळा नयनरम्य व देशभक्तीपर वातावरणात साजरा झाला. याला चार चाँद लावले ते सेवानिवृत्त सैनिक सय्यद यांनी व सोहळ्याला केलेल्या भोजनाने व व्यवस्थेने.

# The Spirit behind The Four-Way-Test

**The Four-Way-Test :**

"Of the things we think, say or do..."

Is it the TRUTH?

Is it FAIR to all concerned?

Will it build GOODWILL and BETTER FRIENDSHIPS?

Will it be BENEFICIAL to all concerned?




The Four Way Test is the guiding light of Rotary. These four simple questions, framed in 1932 by Rotarian Herbert J. Taylor, are not just words. They are a moral compass, a way of life, and a universal code of conduct that applies to our personal, professional, and social lives. Let us look at them one by one. "of the things we think, say or do" means everything in our mind, words, and actions should be guided by these four ethical principles. It's like a moral compass for daily life.

**1. Is it the TRUTH?**

Truth is the foundation of trust. In a world where false promises and half-truths are often seen, truth shines like a lamp If our words and actions are based on truth, we never need to fear being exposed. In business, telling the truth creates loyal customers. In personal life, speaking the truth creates lasting respect. Mahatma Gandhi once said, "Truth never damages a cause that is just." Truth gives us strength and credibility. Swami Vivekananda Said, "Truth may be disturbed but it can never be defeated".

**2. Is it FAIR to all concerned?**

Fairness means justice. It means not taking advantage of others for our own gain. If




something benefits us but harms someone else, it cannot be fair. A businessman who charges a fair price wins trust forever. A leader who treats all team members equally gains loyalty. Fairness creates balance in society and ensures everyone feels valued.

**"The Four-Way Test is not just words. It is a moral compass, a way of life, and a universal code of conduct."**

**"Truth is the foundation of trust. In business, it creates loyal customers; in personal life, it creates lasting respect."**

**3. Will it build GOODWILL and BETTER FRIENDSHIPS?**

What is the use of success if it isolates us? Our words and actions should unite, not divide. Goodwill is like a seed—when we sow kindness, we harvest friendship. A simple smile, a helping hand, or polite words can win more friends than wealth or power. Rotary projects, when done with a spirit of goodwill, bring people together beyond caste, creed, and religion. Friendship is the wealth that never decreases when shared.

**4. Will it be BENEFICIAL to all concerned?**

The highest form of success and greatest pleasure is when everyone benefits. Rotary believes in "Service Above Self," which is nothing but this principle. A water project helps an entire village, not just one family. Conclusion The Four-Way Test is not just a Rotary philosophy—it is a universal truth. It teaches us that: Truth brings credibility, Fairness brings justice, Goodwill builds harmony, And benefit to all brings real progress.

If we all begin to think, speak, and act with these four questions in mind, our families, our businesses, our communities, and our nation will surely shine brighter. So let us pledge today, as Rotarians, to not just recite the Four-Way Test, but to live it, breathe it, and spread it everywhere we go.

**- PDG DR. HARIPRASAD SOMANI**

# स्वत:ला वर्तमानात स्थिर ठेवा!

**भारतीय वैद्यकीय पद्धतीमध्ये TO DISSOCIATE THE DOER FROM THE PROCESS OF DOING ही एक गहन संकल्पना आहे. ही संकल्पना आयुर्वेदात आणि आधुनिक वैद्यकीय पद्धतीमध्ये लागू होतो.**

**आयुर्वेदात :**



आयुर्वेद – एक समग्र विज्ञान असल्यामुळे, जीवन आणि अस्तित्वाच्या तत्वज्ञानाशी खोलवर जोडलेले आहे. कर्त्याला कृती प्रक्रियेपासून वेगळे करण्याचे तत्व भगवद्गीतेतील 'निष्काम कर्म (स्वार्थविरहित कर्म) या संकल्पनेशी मिळते जुळते आहे. या संदर्भात, वैद्याची भूमिका केवळ रुग्णाला बरे करणे ही नसून, शरीरात नैसर्गिकरीत्या असलेल्या रोग बरे करण्याच्या प्रक्रियेला मदत करणे ही आहे.

**वैद्य हा एक माध्यम :** एका वैद्याला निसर्गाची उपचारशक्ती आणि ज्ञानाचे माध्यम मानले जाते. ते उपचाराचे अंतिम कर्ता नसतात. तर शरीराचे नैसर्गिक संतुलन पूर्ववत करण्यास मदत करणारे मार्गदर्शक असतात. त्यांचे लक्ष रुग्णाची प्रकृती, बिघडलेले संतुलन (विकृती) आणि नैसर्गिक शक्ती (वात, पित्त, आणि कफ) यावर असते. यशस्वी उपचाराबद्दल वैद्याचा वैयक्तिक अहंकार किंवा अभिमान कमी असतो.

**कर्म आणि आरोग्य :** आयुर्वेद एखाद्या व्यक्तीच्या आरोग्यामध्ये आणि नशिबामध्ये कर्माची (मागील कृतींची) भूमिका मान्य करतो. जर एखादा वैद्य विशिष्ट परिणामाची जास्त जोडला गेला, तर त्याला रुग्णाच्या कर्मामुळे प्रभावित झालेल्या केसेसमध्ये अडचण येऊ शकते. परिणामापासून अलिप्त राहिल्याने, वैद्य आपल्या हस्तक्षेपाच्या मर्यादा स्वीकारण्यास अधिक सक्षम बनतो आणि



केवळ विहीत उपचारांवर लक्ष केंद्रित करतो.

**आधुनिक वैद्यकीय पद्धती :** (MODERN MEDICINE) आधुनिक वैद्यकीय पद्धत जरी मुख्यत्वे परिणामांवर आधारित असली आणि डॉक्टरलाच मुख्य कर्ता' मानत असली तरी, ही संकल्पना आजही नैतिक आणि व्यावसायिकदृष्ट्या खूप महत्त्वाची आहे.

**व्यावसायिक अलिप्तता :** उदाहरणार्थ एका शल्यचिकित्सकाला (सर्जन) रुग्णाची किंवा उपचाराच्या परिणामाची भावनिकरित्या जोडले न जाता, कुशलतेने आणि एक जटिल शस्त्रक्रिया पार पाडता आली पाहिजे. ही व्यावसायिक अलिप्तता त्यांना प्रचंड दबावाखाली स्पष्ट आणि तर्कसंगत निर्णय घेण्यास मदत करते. येथे लक्ष मी एक चांगला की वाईट डॉक्टर आहे यावर नसून, कार्य योग्य प्रकारे करण्यावर असते.

**सराव करताना अहंकार टाळणे :** एका डॉक्टरचे कर्तव्य नम्र, संयमी आणि रुग्णांच्या कल्याणासाठी काम करणे हे आहे. यामुळे 'कर्ता' असल्याच्या अहंकाराला अप्रत्यक्षपणे प्रोत्साहन मिळत नाही. जेव्हा एखाद्या डॉक्टराचा अहंकार रुग्णांच्या आरोग्यासाठी जोडला जातो, तेव्हा यामुळे बचावात्मक उपचार पद्धती, जास्त औषध देणे किंवा रुग्णाला तज्ज्ञाकडे पाठवण्यास असमर्थता येऊ शकते, ज्यामुळे रुग्णाचे नुकसान होऊ शकते.

**डॉक्टर रुग्ण संबंध:** भारतातील आधुनिक डॉक्टर रुग्ण संबंध बदलले आहेत. पूर्वी तो डॉक्टरला जवळपास देवी मानणारा, पितृतुल्य आणि विश्वासावर आधारित संबंध होता. आता तो INFORMED CONSENT आणि MUTU-L RESPECT वर आधारित संबंध आहे. कर्त्याला वेगळे करण्याची संकल्पना डॉक्टरला रुग्णाला वैयक्तिक प्रकल्प न मानता, केवळ सर्वोत्तम व्यावसायिक काळजी मिळण्यास पात्र असलेली व्यक्ती म्हणून पाहण्यास मदत मिळते.

मग, TO DISSOCI-TE THE DOER FROM² THE PROCESS OF DOING, म्हणजे काय? आपल्या जीवनात ह्या चार गोष्टी केल्या तर आपण सहज हे साध्य करू शकतो.

१) स्वत:ला कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय JUDGEMENT किंवा दोष न देता निरीक्षण करा.
(OBSERVE YOUR SELF WITHOUT JUDGEMENT)

२) आपले लक्ष निकालावरून प्रयत्नांवर केंद्रीत करा.
(SHIFT YOUR FOCUS FROM² OUT COME TO EFFORT)

३) स्वत:ला वर्तमानात स्थिर ठेवा
(REM-IN CALM IN GIVEN MOMENT)

४) LASTLY-ENJOY YOUR LIFE

**- Dr Mehul Rathod**

---

# रोटरी क्लब लातूरच्या भूम येथील रक्तदान शिबिरात ३७ जणांचे रक्तदान




भूम : गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून भूम येथील आचार्य विद्यासागरजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत गुरूवारी प्राचार्य हर्षद राजूरकर यांच्या पुढाकारातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ३७ दात्यांनी सहभाग घेत रक्तदान केले.

लातूर रोटरी क्लब व धाराशिव येथील शासकीय रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने हे रक्तदान शिबिर घेण्यात आले. यात संस्थेतील प्रशिक्षणार्थी तसेच कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या वर्षातील संस्थेमध्ये झालेले हे दुसरे रक्तदान शिबिर आहे. यावेळी प्राचार्य राजूरकर म्हणाले, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. प्रत्येक युवकाने रक्तदान केले पाहिजे. एखाद्याचा जीव वाचविणे म्हणजे संपूर्ण मानवकल्याणाचा जीव वाचविण्यासारखे आहे.

# रोटरी क्लब लातूरला उत्कृष्ट कार्याबद्दल दोन पारितोषिके




लातूर : विविध समाजोपयोगी कार्य, सदस्य वृद्धी आणि उत्कृष्ट नियोजन आदींमुळे प्रांतपाल रो. सुधीर लातुरे यांच्या शुभहस्ते रोटरी क्लब लातूरला दोन प्रथम पारितोषिकांनी गौरविण्यात आले. पारितोषिके रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष ज़कीखान कायमखानी व सर्व रोटरीयन्सनी स्वीकारले.

अकलूज येथील स्मृती भवन येथे रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२च्या वतीने राज्यस्तरीय समारंभ सोहळा रविवार, १७ ऑगस्ट रोजी उत्साहात पार पडला. यावेळी लातूरचा दबदबा राहिला. राज्यातील १०० क्लबमधून सर्वाधिक सदस्यवाढ साध्य करणारा क्लब म्हणून लातूर रोटरी क्लबला प्रथम क्रमांक व

सर्वाधिक रजिस्ट्रेशन करणारा क्लब म्हणूनही लातूर रोटरी क्लबला प्रथम क्रमांक पटकाविला. प्रांतपालांनी आपल्या भाषणात रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष ज़कीखान कायमख़ानी यांच्या नेतृत्वाखालील उत्कृष्ट नियोजन व कार्यशैलीचे मनापासून कौतुक केले. रोटरी क्लब लातूरमधील सर्व सदस्य – अनुभवी, नवे, तरुण – हे एकदिलाने, एकतेने आणि उत्साहाने सामाजिक उपक्रम राबवितात. कार्यक्रमास सर्वांनी एकसमान ड्रेस कोडमध्ये हजेरी लावून आपला उत्साह व शिस्त दाखवल्याने त्यांच्या या जोशपूर्ण सहभागाचेही कौतुक करण्यात आले.

या ऐतिहासिक क्षणी रोटरी क्लब लातूरचे सचिव रो. विश्वनाथ निगुडगे , मेंबरशिप डायरेक्टर रो. मोहन परदेशी, रो. सुशांत कुलकर्णी, रो. प्रवीण होळीकर, रो. अनिरुद्ध मुचळंबकर, रो. विलास जिलावार, रो. रामप्रसाद राठी, रो. राजकुमार गिरवलकर, रो. सतीष बोरा, सौ. संगीता बोरा, रो. महेंद्र जोशी, रो. विनोद लड्डा, रो. नानीक जोधवानी, रो. बाबूराव सोमवंशी, रो. ब्रह्मकुमार सुवर्णकार , रो. ॲड. बळवंतराव देशपांडे, रो. उत्तरेश्वर हेरकर, रो. जांबुवंतराव सोनकवडे, रो. नरेश कोरे, रो. संदीपान जगडाळे, रो. विश्वजित कदम, रो.उमाकांत पेन्शलवार, रो. प्रवीण रणदिवे सॅटेलाईट क्लब अध्यक्ष रो. कौशल्या सोनकवडे, सचिव रो. वनिता लचुरिया, रो. डॉ. अर्चना लड्डा, रो. आनंदा कोचेटा, रो. मैना कावळे, रो. आरती कुलकर्णी, रो. अर्चना होळीकर, रो. मधुमती सुवर्णकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. हा सन्मान सर्व सदस्यांच्या एकजुटीचा, परिश्रमाचा आणि उत्साही सहभागाचा असल्याचे रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष ज़कीख़ान कायमखानी म्हणाले. अकलूज येथील हा सोहळा ऐतिहासिक ठरला.








लोकमत समाचार

एक नजर...

रोटरी क्लब लातूर को दो पुरस्कार मिले


लोकमत

'रोटरी क्लब'ला दोन राज्यस्तरीय पारितोषिके


दिव्य मराठी लातूर जिल्हा 21-08-2025

रोटरी क्लब लातूरला उत्कृष्ट कार्याबद्दल दोन पारितोषिके

तरुण विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात

# अकलूज सहलीचा अविस्मरणीय प्रवास; रोटरीयन्स उत्साहित

लातूर ते अकलूज प्रवास रोटरी क्लब सदस्यांसाठी अविस्मरणीय ठरला. लातूरमधून निघाल्यापासून ते अकलूज गेल्यानंतर रोटरी क्लबचा पुरस्कार सोहळा आणि त्यानंतर शिवसृष्टी किल्ल्याला भेट अविस्मरणीय क्षणाचा साक्षीदार ठरला. रोटरी क्लब लातूरचे चक्रधर पत्राचे यावेळी प्रकाशनही मान्यवरांच्या उपस्थितीत थाटात झाले. एक आगळा वेगळा प्रवास ऐतिहासिक ठरला. त्याची काही क्षणचित्रे.























अधिक माहितीसाठी संपर्क :
कायमखानी पेट्रोल पंप, अंबाजोगाई रोड, लातूर. मो. ९८२३११६०७०

संपादक :
रो. नागनाथ कलवले.
९७६४७ ८८२८८

डिझाईन, लेआऊट
एम.एस. मीडिया, लातूर
८८३०२७३०३८